(66)

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** छत्रपती संभाजीनगर(ग्रामीण) **P.S.(ठाणे):** वैजापूर
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0165 **Year (वर्ष):** 2024
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 08/03/2024 19:33

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** शुक्रवार **Date From (दिनांक पासून):** 08/03/2024
**Time Period (कालावधी):** पहर 4 **Date To ( दिनांक पर्यंत):** 08/03/2024
**Time From (वेळेपासून):** 12:14 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 12:15 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 08/03/2024 **Time (वेळ):** 19:26 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 047
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 08/03/2024 19:24 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
दक्षिण, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** पंचायत समिती वैजापुर तावैजापु,ता वैजापुर येथे

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** अरुण भाऊसाहेब कदम
(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**
(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1986
(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत
(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**
(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**
**Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**
(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | रासंवदंगाव तावैजापुर,वैजापूर,छत्रपती संभाजीनगर(ग्रामीण),महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | रासंवदंगाव तावैजापुर,वैजापूर,छत्रपती संभाजीनगर(ग्रामीण),महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**
(j) **Phone number (फोन नं.):**
**Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | वैभव रावसाहेब गुडदे | | | 1. पद तांत्रिक सहाय्यक नरेगा, पंचायत समिती वैजापुर ,ता वैजापुर,वैजापूर,छत्रपती संभाजीनगर(ग्रामीण),महाराष्ट्र, भारत |
| 2 | जितेंद्र कोंडाजी कदम | | | 1. रोजगार सेवक, मौजे ग्रामपंचायत,मौजे ग्रामपंचायत सवंदगांव ता ,ता वैजापुर, वैजापूर,छत्रपती संभाजीनगर (ग्रामीण),महाराष्ट्र,भारत |

67

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-) (चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11. **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद

दि. 08-03-2024

मी अरुण भाऊसाहेब कदम वय 38 वर्ष धंदा- शेती रा. संवदंगाव ता.वैजापुर जिल्हा छत्रपती संभाजीनगर मो. 8830843423

समक्ष पोलीस स्टेशन वैजापुर छत्रपती संभाजीनगर येथे हजर राहुन सांगतो की, "मी दिनांक 05/03/2024 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग छत्रपती संभाजीनगर येथे हजर राहुन लेखी तक्रार दिली की, "मी वरील ठिकाणी परिवारासह राहतो व माझी वडीलोपार्जीत शेती असुन आम्ही शेती करतो. माझे वडील भाऊसाहेब दगु कदम वय 65 वर्ष धंदा शेती यांचे नावे गट नं 343 मध्ये 0-84 आर शेत जमीन आहे. माझे वडील वयोवृध्द असुन त्यांना लिहीता वाचता येत नाही त्यामुळे मी त्यांचे सर्व अर्थिक व इतर दैनदिनी कामकाज मी पाहत असतो. माझ्या वडीलांनी अंदाजे सहा महिन्यापुर्वी पंचायत समिती वैजापुर येथे रोजगार हमी योजने अंतर्गत गायगोठा मंजुर होण्यासाठी अर्ज केला होता. त्यानंतर त्यांच्या अर्जावर 1,53,000/- रुपये गोयगोठा करीता मंजुर झाले व त्यानंतर अकुशल पेमेंन्ट 8 हजार रुपये सहा मजुराच्या बँक खात्यावर जमा झाले. उर्वरित कुशल पेमेंटचे 1,22,00/- रुपये माझ्या वडीलांच्या खात्यावर व उर्वरित रक्कम मजुराच्या खात्यावर दुसरा हप्ता जमा होईल असे श्री जितु कदम रोजगार सेवक, ग्रामपंचायत संवदंगाव यांनी दिनांक 04-03-2024 रोजी मी वैजापुर पंचायत समिती कार्यालयात गेलो असता त्यांनी सांगीतले होते.

आज रोजी पंचायत समिती वैजापुर कार्यालयात सकाळी गेलो असता मला श्री वैभव गुडदे इंजिनिअर पंचायत समिती वैजापुर हे भेटले. ते मला म्हणाले की, तुमच्या वडीलांचा नावे मंजुर गाय गोठाचे कामाचे मुल्यांकन करुन तसा अहवाल पंचायत समिती येथे पाठविला जाईल. अहवालाशिवाय वडीलांचे खात्यावर 1,22,000/-रुपयाचे कुशल बील जमा होणार नाही. गाय गोठा अर्जावर मंजुर झालेले 1,22,000/- रुपयाचे बील व एम बी करण्यासाठी जी. एस.टी.बील घेऊन श्री जितु कदम रोजगार सेवक यांना भेटुन घ्या व त्यांच्याकडे द्या.

त्यानंतर काही वेळात त्याच ठिकाणी श्री जितु कदम रोजगार सेवक यांची भेट झाली. तेव्हा श्री जितु कदम हे मला म्हणाले की, तुमच्या वडीलांचे नावे असलेले कुशल पेमेंट 1,22,000/- रुपयाचे बील जर मार्च एडिंगच्या अगोदर हवे असेल तर इंजिनिअर श्री वैभव गुडदे यांनी 10,000/- रुपये घेऊन येण्याचे सांगीतले आहे. त्यावेळी मी त्यांना म्हणालो की, माझ्याजवळ ऐवढे पैसे नाहीत. परंतु ते म्हणाले की, तुझ्या वडीलांचे नावे असलेले मंजुर गाय गोठयाचे कामाचे मुल्यांकन करुन तसा अहवाल पंचायत समिती येथे पाठविणार नाही त्यामुळे तुमचे 1,22,000/- रुपयाचे कुशल बील निघणार नाही. त्यावेळी मी त्यांना नाईलाजास्तव हो म्हणुन तेथुन निघुन आलो.

मी उद्या दिनांक 06-03-2024 रोजी श्री जितु कदम रोजगार सेवक यांना आमच्या गांवात त्यांच्या घरी भेटणार आहे. त्यानंतर श्री वैभव गुडदे इंजिनिअर यांना पंचायत समिती वैजापुर येथे भेटण्यास जाणार आहे. त्या दोघांनी माझ्या वडीलांच्या अर्जावरुन मंजुर गाय गोठयाचे कामाचे मुल्यांकन करुन तसा अहवाल पंचायत समिती येथे पाठविण्यासाठी व वडीलांचे खात्यावर 1,22,000/-रुपयाचे कुशल बील जमा होण्यासाठी पैशाची मागणी केल्यास त्याच्या विरुध्द कार्यवाही करावी. माझे श्री जितु कदम रोजगार सेवक, श्री वैभव गुडदे इंजिनिअर याचे सोबत

कोणतेही देणे घेणे अगर इतर ऊसणवारीचे व्यवहार नाही, तसेच माझी कोणतेही वैर दुश्मनी नाही. माझी तक्रार मी माझ्या स्वहस्ताक्षंरात लिहुन दिली आहे. माझी तक्रार मी माझ्या स्वहस्ताक्षंरात लिहुन दिली आहे." सदर तक्रारीच्या अनुषंगाने पोलीस निरीक्षक श्रीमती निकम मॅडम यांनी दोन्ही शासकीय पंचांची व सापळा पथकातील सदस्यांची ओळख करुन दिली. त्यानंतर मी दिलेली तक्रार उपस्थितीत असलेले शासकीय पंचाना वाचावयास दिली पंचानी ती तक्रार वाचल्यानंतर त्यावर पंचानी सहया केल्या व पोलीस निरीक्षक श्रीमती निकम मॅडम यांनी सदर तक्रारीवर समक्ष म्हणुन सही केली.

त्यानंतर पोलीस निरीक्षक श्रीमती निकम यांनी सांगीतले की, आपणास तुमच्या तक्रारीवरुन 1) श्री जितु कदम रोजगार सेवक ग्रामपंचायत संवदंगाव, ता.वैजापुर व 2) श्री वैभव गुडदे इंजिनिअर पंचायत समीती वैजापुर यांची लाचमागणी पडताळणी करण्यासाठी पहिले रोजगार सेवक श्री जितु कदम यांची भेट घेण्यासाठी त्यांच्या घरी संवदंगाव येथे जावे लागणार आहे. त्याकरीता तुम्ही, पंच क्रमांक 1 श्री शेख मोईनोद्दीन असे तुमच्याकडील दुचाकी वाहनाने रोजगार सेवक श्री जितु कदम यांच्या घरी जावे. जाण्यापुर्वी सापळा पथकातील पोहवा श्री पाटील यांनी डिजीटल व्हाईसरेकॉर्डरचे प्रात्यक्षिक करुन दाखवुन त्यामध्ये एक नवीन मेमरी कार्ड टाकले.सदरचे डिजीटल व्हाईसरेकॉर्डर चालु करुन माझ्या अंगावर असलेल्या शर्टच्या आतील बाजुस कोणास दिसणार नाही अशारितीने व्यवस्थित ठेवले. त्यानंतर मला व पंच श्री शेख मोईनोद्दीन असे माझ्या मोटार सायकलने रोजगार सेवक श्री जितु कदम यांच्या घरी सवंदगांव कडे जाण्याकरीता रवाना झालो.

आम्ही दोघेजण मोटार सायकलवरुन श्री जितु कदम यांच्या घरी गेलो. तेथे माझे व श्री जितु कदम यांच्यात माझ्या वडीलांचे गायगोठा मंजुर रक्कम व एम.बी. करणे साठी बांधकाम मटेरीयल खरेदी पावत्या घेऊन येण्यास सांगीतले. काही वेळाने मला पंचायत समिती वैजापुर येथे येऊन श्री गुडदे इंजिनिअर यांना भेटा मी सुध्दा तेथेच राहील असे श्री जितु कदम म्हणला, त्यानंतर मी, पंच श्री शेख मोईनोद्दीन असे मोटारसायकलने शासकीय वाहन थांबलेल्या सुरक्षित ठिकाणी परत आलो.

त्यानंतर आम्ही सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत आलो व वरील सर्व हकीगत पोलीस निरीक्षक श्रीमती निकम मॅडम यांना सांगीतली. त्यानंतर श्रीमती निकम मॅडम, शासकीय वाहनाने व मी माझ्या दुचाकी वाहनाने पंचायत समिती वैजापुर कडे रवाना झालो. पंचायत समिती वैजापुर कार्यालयाचे अलीकडे सुरक्षित ठिकाणी शासकीय वाहन थांबविले.

त्यानंतर पोलीस निरीक्षक श्रीमती निकम मॅडम यांनी सांगीतले की, श्री वैभव गुडदे इंजिनिअर पंचायत समीती वैजापुर यांची लाचमागणी पडताळणी करण्यासाठी पंचायत समिती वैजापुर कार्यालयात जावे लागणार आहे. त्याकरीता तुम्ही, पंच क्रमांक 1 श्री शेख मोईनोद्दीन असे तुमच्याकडील दुचाकी वाहनाने श्री वैभव गुडदे इंजिनिअर पंचायत समीती वैजापुर यांच्या कार्यालयात जावे. जाण्यापुर्वी सापळा पथकातील पोहवा श्री पाटील यांनी डिजीटल व्हाईसरेकॉर्डर मध्ये एक नवीन मेमरी कार्ड टाकले. सदरचे डिजीटल व्हाईसरेकॉर्डर चालु करुन माझ्या अंगावर असलेल्या शर्टच्या आतील बाजुस कोणास दिसणार नाही अशारितीने व्यवस्थित ठेवले. त्यानंतर मला व पंच श्री शेख मोईनोद्दीन असे माझ्या मोटार सायकलने रोजगार सेवक श्री वैभव गुडदे इंजिनिअर यांची भेट घेण्यासाठी पंचायत समिती कार्यालय वैजापुरकडे जाण्याकरीता रवाना झालो.

आम्ही दोघेजण मोटार सायकलवरुन श्री वैभव गुडदे यांच्या पंचायत समिती कार्यालयात वैजापुर येथे गेलो असता सदर ठिकाणी श्री वैभव गुडदे यांची भेट झाली नाही. सदर ठिकाणी पुन्हा श्री जितु कदम भेटले. आमच्यात पुन्हा माझ्या वडीलांचे गायगोठा मंजुर कुशल रक्कम व एम.बी. करणे साठी बांधकाम मटेरीयल खरेदी पावत्या बाबत चर्चा झाली. उद्या तुम्ही येऊन श्री वैभव गुडदे यांना भेटा असे सांगीतले. त्यानंतर मी, पंच श्री शेख मोईनोद्दीन असे मोटारसायकलने शासकीय वाहन थांबलेल्या सुरक्षित ठिकाणी परत आलो.

त्यानंतर आम्ही सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत आलो व वरील सर्व हकीगत पोलीस निरीक्षक श्रीमती निकम मॅडम यांना सांगीतली. त्यानंतर श्रीमती निकम मॅडम, यांच्या सुचनेवरुन दिनांक 07/03/2024 रोजी पुन्हा श्री वैभव गुडदे, श्री जितु कदम यांची पडताळणी करण्याचा निर्णय घेतला. सर्व गोपनीयता बाळगण्याची सुचना देऊन जाण्यास सांगीतले.

दिनांक 07/03/2024 रोजी मी खाजगी दुचाकी वाहनाने व श्रीमती निकम मॅडम शासकीय वाहनाने पुन्हा पंचायत समिती वैजापुर कार्यालयाचे अलीकडे सुरक्षीत ठिकाणी येऊन थांबलो. काही वेळाने श्री वैभव गुडदे, श्री जितु कदम यांच्या मोबाईल फोनवरुन मला फोन आला की, पंचायत समिती कार्यालयात येऊन जा. तेव्हा श्रीमती निकम मॅडम यांनी श्री वैभव गुडदे इंजिनिअर व श्री जितु कदम यांची लाचमागणी पडताळणी करण्यासाठी पंचायत समिती वैजापुर कार्यालयात जावे लागणार आहे. त्याकरीता तुम्ही, पंच क्रमांक 1 श्री शेख मोईनोद्दीन असे तुमच्याकडील दुचाकी वाहनाने श्री वैभव गुडदे इंजिनिअर पंचायत समीती वैजापुर यांच्या कार्यालयात जावे. जाण्यापुर्वी सापळा

पथकातील पोहवा श्री पाटील यांनी डिजीटल व्हाईसरेकॉर्डर मध्ये एक नवीन मेमरी कार्ड टाकले. सदरचे डिजीटल व्हाईसरेकॉर्डर चालु करुन माझ्या अंगावर असलेल्या शर्टच्या आतील बाजुस कोणास दिसणार नाही अशारितीने व्यवस्थित ठेवले. त्यानंतर मला व पंच श्री शेख मोईनोद्दीन असे माझ्या मोटार सायकलने रोजगार सेवक श्री वैभव गुडदे◌ं इंजिनिअर यांची भेट घेण्यासाठी कार्यालय पंचायत समिती वैजापुरकडे जाण्याकरीता रवाना झालो.
पंच व मी असे दोघेजण मोटार सायकलवरुन श्री वैभव गुडदे◌ं यांच्या कार्यालयात पंचायत समिती वैजापुर येथे गेलो असता सदर ठिकाणी श्री जितु कदम रोजगार सेवक यांची भेट झाली त्यांनी माझ्याकडे माझ्या वडीलांचे मंजुर वडीलांच्या अर्जावरुन मंजुर गाय गोठाचे कामाचे मुल्यांकन करुन तसा अहवाल पंचायत समिती येथे पाठविण्यासाठी व वडीलांचे खात्यावर 1,22,000/-रुपयाचे कुशल बील जमा होण्यासाठी सर्व काम करण्यासाठी पंचासमक्ष 10,000/- रुपयाची लाचेची मागणी केली. तेंव्हा मी श्री जितु कदम यास म्हणालो की, आपण श्री वैभव गुडदे◌ं याना समक्ष भेटुन घेऊ. तेव्हा मी, पंच व श्री जितु कदम असे श्री वैभव गुडदे◌ं यांच्या कक्षात गेलो. तेव्हा त्याठिकाणी माझी, श्री जितु कदम व श्री वैभव गुडदे◌ं आमच्या तिघांत माझ्या वडीलांचे अर्जावरुन मंजुर गाय गोठाचे कामाचे मुल्यांकन करुन तसा अहवाल पंचायत समिती येथे पाठविण्यासाठी व वडीलांचे खात्यावर 1,22,000/- रुपयाचे कुशल बील जमा होण्यासाठी सर्व काम करण्यासाठी चर्चा झाली तेव्हा श्री जितु कदम रोजगार सेवक व श्री वैभव गुडदे◌ं इंजिनिअर पंचायत समिती कार्यालय वैजापुर यांनी सर्व काम करण्यासाठी 10,000/- रुपयाची मागणी करुन तडजोडीअंती पंचासमक्ष 8,000/- रुपये लाचेची मागणी करुन स्विकारण्याचे मान्य केले. सदर लाचेची रक्कम लगेच आणुन देण्याचे सांगीतले. मी माझ्या जवळ असलेल्या बांधकाम मटेरीयल खरेदी जी.एस.टी.पावत्या श्री जितु कदम यांच्याकडे दिल्या. त्यानंतर मी, पंच श्री शेख मोईनोद्दीन असे मोटारसायकलने शासकीय वाहन थांबलेल्या सुरक्षित ठिकाणी परत आलो. त्यानंतर आम्ही सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत आलो व वरील सर्व हकीगत पोलीस निरीक्षक श्रीमती निकम मॅडम यांना सांगीतली.
पोलीस निरीक्षक श्रीमती निकम मॅडम यांनी मला, सापळा पथक व पंचाना सापळा कारवाई बाबत थोडक्यात माहीती दिली व श्री जितु कदम किंवा श्री वैभव गुडदे◌ं यांनी लाच स्वीकरल्यानंतरचा नियोजीत ईशारा करण्यास सांगीतले.
मी माझ्या बचतीतुन रक्कम 8,000/- रुपये पोलीस निरीक्षक श्रीमती निकम मॅडम यांच्यासमोर हजर केले.
मी आणलेले 8000/- रुपये नोटांना ऍ◌न्थ्रॅसीन पावडर लावून लाचेची रक्कम श्री जितु कदम किंवा श्री वैभव गुडदे◌ं यांना देण्याकरीता माझे पॅन्टचे उजव्या बाजुच्या खिशात ठेवली व व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन माझ्याजवळ दिला. त्यानंतर मी, व पंच शेख मोईनोद्दीन असे सुरक्षित ठिकाणाहुन दुचाकी वाहनाने पंचायत समितीच्या कार्यालयाकडे जाण्यासाठी रवाना झालो.
आम्ही दोघेजण मोटार सायकलवरुन पंचायत समिती कार्यालयात वैजापुर येथे गेलो असता मी श्री वैभव गुडदे यांना व श्री जितु कदम हे भेटुन आले नाही, म्हणुन त्यांना माझ्या मोबाईल फोनवरुन त्यांना फोन केले असता श्री वैभव गुडदे◌ं इंजिनिअर हे पानगव्हाण येथे गेले असुन श्री जितु कदम हे नालेगांव येथे गेले असुन सकाळी येईल असे सांगीतल्याने मी, पंच श्री शेख मोईनोद्दीन असे मोटारसायकलने शासकीय वाहन थांबलेल्या सुरक्षित ठिकाणी परत आलो. त्यानंतर वरील सर्व हकीगत पोलीस निरीक्षक श्रीमती निकम मॅडम यांना सांगीतली.
त्यानंतर श्रीमती निकम मॅडम, यांच्या सुचनेवरुन दिना

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरुन अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): Shamsundar Ramchandra Kauthale(I (Inspector)) / PI **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव): **No.**(क्र.):

**Rank** (पद): **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

C.C.T.N.S प्रणाली मध्ये आठहजार शब्दाची मर्यादा असल्याने उर्वरित फिर्याद हि सोबत जोडलेली आहे



पोलीस ठाणे अंमलदार
पोलीस ठाणे वैजापुर
छत्रपती संभाजीनगर ग्रामीण

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) **.**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):
Bxadav

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): Shamsundar Ramch
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): PI

पोलीस ठाणे अंमलदार
पोलीस ठाणे वैजापुर
छत्रपती संभाजीनगर ग्रामीण

त्यानंतर श्रीमती निकम मॅडम यांच्या सुचनेवरुन 8000/- रुपये नोटांना ऍन्थ्रॅसीन पावडर लावून लाचेची रक्कम श्री जितु कदम यांना देण्याकरीता माझे पॅन्टचे उजव्या बाजुच्या खिशात ठेवली व व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन माझ्याजवळ दिला. त्यानंतर मी, व पंच शेख मोईनोद्यीन असे सुरक्षित ठिकाणाहुन दुचाकी वाहनाने सवंदगावातील श्रीराम अग्रो दुकानाच्या बाजुला जाण्यासाठी रवाना झालो.

माझी व श्री जितु कदम रोजगार सेवक यांची भेट झाली त्यावेळी मी माझ्या वडीलांचे कुशल पेमेन्ट संदर्भात बोलणे चालु असतांना मी, श्री जितु कदम यास म्हणालो की, **हे बघ, गुडदे साहेबान सांगल्या प्रमाण,** त्यावर श्री जितु कदम म्हणला की, **हा ना तसच करायच** त्यावर मी म्हणालो की, **आठ हजार रुपये तुम्हाला मोजुन घ्या,** मी माझ्या पॅन्टच्या समोरील उजव्या बाजुच्या खिशातुन उजव्या हाताने 8000/- रुपये लाचेची रक्कम काढुन ü श्री जितु कदम याच्या समोर धरले व **मोजुन घ्या** त्यावर श्री जितु कदम म्हणाले की, **नाही नाही ,** त्यावर मी म्हणलो की, **नही मोजुन घ्या कस राहत पुन्हा,** त्यावर श्री जितु कदम म्हणाला की, **नही कही मोठ मॅटर नाही,** त्यावर मी म्हणाला की, **नही काही नाही,** असे म्हणुन पंचासमक्ष श्री जितु कदम यांनी त्यांच्या उजव्या हाताने लाचेची 8000/- रुपये रक्कम स्विकारली त्यांच्या पॅन्टच्या पाठीमागील खिशात ठेवली त्यावेळेस मी पुर्वनियोजीत इशारा पोलीस निरीक्षक श्रीमती निकम मॅडम व सापळा पथकास केला ती वेळ 12.14 अशी होती.

त्यानंतर सदर ठिकाणी पोलीस निरीक्षक श्रीमती निकम मॅडम हे सापळा पथकासह हजर आले. तेव्हा पोलीस निरीक्षक श्रीमती निकम मॅडमने यांनी स्वत:चा परिचय देऊन रोजगार सेवक श्री जितु कदम यांना त्यांचे नाव गांव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव श्री जितेंद्र कोंडाजी कदम वय 38 वर्ष धंदा नौकरी, पद- रोजगार सेवक, मौजे ग्रामपंचायत सवंदगांव, ता.वैजापुर, जि.छत्रपती संभाजीनगर, रा. मु.पो. सवंदगांव, ता.वैजापुर, जिल्हा छत्रपती संभाजीनगर असे सांगीतले. त्यानंतर दोन्ही पंचासमक्ष शासकीय वाहनामध्ये दरवाजे व काचा बंद करुन आलोसे श्री जितेंद्र कदम यांच्या दोन्ही हाताच्या तळ हातावर व अंगात परिधान केलेल्या शर्ट- पॅन्टवर अल्ट्रा व्हायलेट लॅम्पच्या सहाय्याने प्रकाश टाकुन निरीक्षण केले असता आलोसे श्री. जितेंद्र कदम यांच्या उजव्या हाताच्या पाचही बोटांचे पेऱ्यावर व पॅन्टच्या पाठीमागील खिशाच्या आत व खिशाच्या तोंडावर ऍथ्रासीन पावडरची हिरवट/ताबुस रंगाची चकाकी दिसुन आली. सदरची वस्तुस्थिती आलोसे श्री जितेंद्र कदम यांचे निदर्शनास आणुन दिली. त्यानंतर श्रीमती निकम मॅडम यांनी आलोसे श्री जितेंद्र कदम यांना श्री वैभव गुडदे यांच्याबाबत विचारणा करुन त्यांना त्यांच्या मोबाईल फोनवरुन फोन करण्यास सांगीतले परंतु आलोसे श्री वैभव गुडदे यांचा मोबाईल फोन स्विच ऑफ आहे असे सांगीतले. त्यांबाबत सविस्तर पंचनामे पोलीस निरीक्षक श्रीमती निकम मॅडम यांनी केलेले आहेत.

दिनांक 07/03/2024 रोजी 1) आलोसे श्री वैभव रावसाहेब गुडदे वय 26 वर्ष धंदा नौकरी - पद तांत्रिक सहाय्यक नरेगा, पंचायत समिती वैजापुर ता.वैजापुर जि.छत्रपती संभाजीनगर, 2)आलोसे श्री जितेंद कोंडाजी कदम वय 36 वर्ष धंदा नौकरी, पद- रोजगार सेवक, मौजे ग्रामपंचायत सवंदगांव ता. वैजापुर जि.छत्रपती संभाजीनगर यांनी पंचायत समिती वैजापुर कार्यालयात वडीलांच्या अर्जावरुन मंजुर गाय गोठयाचे कामाचे मुल्याकंन करुन तसा अहवाल पंचायत समिती येथे पाठविण्यासाठी व वडीलांचे खात्यावर 1,22,000/-रुपयाचे कुशल बील जमा होण्यासाठी पंचासमक्ष 10,000/-रुपयाची लाचेची मागणी करुन तडजोडीअंती 8000/- रुपयाची लाचेची मागणी करुन स्विकारण्याचे मान्य केले.

आज दिनांक 08/03/2024 रोजी आलोसे श्री. जितेंद कोंडाजी कदम वय 36 वर्ष धंदा नौकरी, पद- रोजगार सेवक, मौजे ग्रामपंचायत संवदगाव ता. वैजापुर जि.छत्रपती संभाजीनगर यांनी आलोसे श्री वैभव गुडदे यांच्या सांगण्यावरुन संवदगांव येथील श्रीराम ऍग्रो दुकानाच्या बाजुला माझ्याकडुन ऍथ्रासीन पावडर लावलेली 8000/- रुपये लाचेची रक्कम **12.14** वाजता पंचा समक्ष स्विकारली. तसेच श्री वैभव रावसाहेब गुडदे वय 26 वर्ष धंदा नौकरी - पद तांत्रिक सहाय्यक नरेगा, पंचायत समिती वैजापुर ता.वैजापुर जि.छत्रपती संभाजीनगर यांनी 8,000/- रुपये लाचेची मागणी केली म्हणुन माझी दोघांविरुध्द फिर्याद आहे.

माझी वरील फिर्याद माझे सांगणे प्रमाणे संगणकावर मराठीत टंकलीखीत केली असुन मी वाचुन पाहिली आहे. ती बरोबर व खरी आहे.

हि फिर्याद दिली.

(सही)

समक्ष

(सही)

**पोलीस ठाणे अंमलदार**
**पोलीस ठाणे वैजापुर**
**छत्रपती संभाजीनगर ग्रामीण**